## रे.मु.नं. १७५/२०१० मधील निशाण क्र.१४३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.१३ अनिल शंकर पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१३ अनिल शंकर पवार हे दि.०६.१०.२०१८ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी यांचे मृत्यू पश्च्यात त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतची माहिती तसेच त्यांचे मृत्यूबाबतची माहिती वादी यांचेकडून अनावधानाने व अज्ञानपणामुळे वकीलांना देण्याचे राहून गेल्यामुळे प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. यातील प्रतिवादी क्र.२ ताराबाई रामचंद्र पवार या दि.२०.११.२०२३ रोजी मयत झालेबाबतची माहिती वादीचे वकीलांना वादीने दिली, त्यावेळीच वादीने सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.६, ८, १२ व १३ मयत असलेबाबतची माहिती वादीचे वकीलांना दिली. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी आवश्यक असलेची माहिती वादीस वकीलाकडून समजलेनंतर वादीने प्रतिवादी क्र.१३ यांच्या मृत्युचा दाखला मिळणेकरिता सांगोला नगरपरिषद कार्यालय येथे चौकशी केली असता प्रतिवादी क्र.१३ यांचे मृत्युची नोंद सबंधित कार्यालयात नसल्याचे संबंधित कार्यालयाकडून वादीस सांगण्यात आले. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.१३ यांचे मृत्युचा दाखला उपलब्ध होवू शकला नाही. त्यानंतर प्रतिवादी क्र.१३ यांचे वारसाची नावे, वय, पत्ता वकीलांकडे देवून या अर्जासोबत प्रतिवादी क्र.१३ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१३ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता सुमारे ०५ वर्ष ०१ महिन्याचा विलंब झालेला आहे. वादीने सदरचा विलंब हा जाणीवपूर्वक केलेला नाही. दाव्याचेकामी प्रतिवादी क्र.१३ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच सदर विलंब माफ केल्यास प्रतिवादीचे कोणत्याही प्रकाराचे नुकसान होणार नाही. तरी मयत प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ तर्फे म्हणणे देण्यात आले. प्रतिवादीचे कथन की, अर्ज खरा नाही. वादीचे सदर मयत प्रतिवादी हे जवळचे नातेवईक असूनही कसल्याही योग्य कारणाशिवाय मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द डिक्लेरेशन, वाटप व पृथक कब्जा मिळणेकामी दाखल केलेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१३ हे दि.०६.१०.२०१८ रोजी मयत झालेले आहेत. वादीने सदर अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१३ यांचा मुत्युचा दाखला मिळणेकरिता सांगोला नगरपरिषद कार्यालयात चौकशी केली असता त्यांच्या मृत्युची नोंद सदर कार्यालयात नसल्याचे त्यांना सदर कार्यालयातून सांगणयात आले. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.१३ यांचा मृत्युचा दाखला उपलब्ध होवू शकला नाही. प्रतिवादी क्र.१३ हे दि.०६.१०.२०१८ रोजी मयत झाले आहेत या कथनाच्या पुष्ठ्यर्थ वादीने नि.क्र.१४४ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदरकामी वादीने प्रतिवादी क्र.१३ चे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर घेणे जरुरीचे होते, परंतू वादीस प्रतिवादी क्र.१३ च्या वारसांना वेळेत अभिलेखावर आणता आले नाही. त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. वादीचे अर्जात नमूद कारण, तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र.१३ च्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादी यांना प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू, वादीने प्रतिवादी क्र.१३ च्या वारसास मुदतीत रेकॉर्डवर समावेश न केल्यामुळे प्रतिवादीस विनाकाराण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे सदरची बाब वादीवर खर्चाचे आदेश पारीत करुन काही अंशी कमी करता येवू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज वादीने रक्कम रु.५००/– प्रतिवादीस खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

दिनांक – १२/१२/२०२४.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:01:17 +0530

(एस.एस. साळुंखे)
३रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.